(26) (3)

**जिल्हाधिकारी कार्यालय (भुसंपादन) वाशिम**
काटारोड वाशिम-४४४५०५
आयएसओ ९००१:२००८ मानांकित कार्यालय
दुरध्वनी क्रमांक :०७२५२-२३३६५३ फॅक्स : ०७२५२-२३२८५८
ईमेल - laowashim@gmail.com वेबसाईट http://www.washim.nic.in

क्र.कक्ष-१६/मं.अ./भुसं.१/कावि- 66 /२०२१ दिनांक :- 5/०६/२०२१

## जाहीर सुचना
## भूसंपादन विभाग जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम

उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र.2 जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम यांच्या कार्यालयासाठी पुरवठादार व कंत्राटदार यांच्याकडून भाडे दरपत्रक भाडे तत्त्वावर वाहने पुरवण्याबाबत दरपत्रक मागविण्यात येत आहे.

| अ. क्र | विभाग | कार्यक्षेत्र | वाहनाचा प्रकार | संख्या |
|---|---|---|---|---|
| 1 | **भूसंपादन विभाग क्र.2 जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम** | वाशिम जिल्हा | टोयोटा इनोव्हा /TUV300 PLUS/बोलेरो 7 seater क्षमता असलेले,1 जानेवारी 2021 खरेदीचे वर्षातील वाहन | 1 चालकासह |

भाडे दरपत्रक (बंदपाकीट) स्विकारण्याचे स्थळ -भुसंपादन कार्यालय क्र.2 वाशिम
भाडे दरपत्रकप्रसिध्दीचा दि. 09/06/2021 सकाळी 11.00 वाजता.
भाडे दरपत्रक भरण्याची अंतीम दिनांक 16/06/2021 दु. 5.00 वाजेपावेतो.
भाडे दरपत्रक उघडण्याचा दिनांक 17/06/2021 रोजी दुपारी 2.00 वाजता.

नियम व अटी शर्ती खालील प्रमाणे

1. वाहन टुरिस्ट परमिट (प्रवासी वाहतुक करणारे) असलेले असावे.
2. सदर वाहनाचा दर हा वाहन चालकासह नमुद करण्यात यावा.
3. भाड्याने लावयाचे वाहन हे 01 जानेवारी, 2021 नंतरचे मॉडेल असणे आवश्यक राहिल.
4. वाहन 11 महिणे भाडे करारावर लावण्यात येईल. शासनाकडुन शासकीय वाहन उपलब्ध झाल्यास किंवा सेवा व्यवस्थित न दिल्यास सदर वाहन मालकास नोटीस देऊन वाहनाचा करार रद्द करण्यात येईल.
5. निवीदेत सविस्तर खर्च नमुद करावा. उदा. वाहन भाडे,टुरीस्ट कर, विमाकर, टोलनाके, पार्कींग,वाहन टुरीस्ट.परमिट असल्याने इतर राज्यातील कर एवढया बाबीचा समावेश असावा.
6. वाहनाचा ग्रामीन भागात ,डोगंराळ भागात व अतिदुर्गम भागात वापर करण्यात येईल.
7. वाहनाचा दर्शनी व मागील भागात on govt. duty असे लिहीणे बंधनकारक आहे. तसेच वाहनाचा करार संपल्यानंतर सदरचे नांव काढणे बंधनकारक राहिल. वाहनावर खाजगीरीत्या कोणतेही नांव लिहीता येणार नाही.
8. सदरचे वाहन हे चालकसह पुरवावयाचे आहे.
9. वाहनासाठी वगण, दुरुस्ती, वाहनाचा विमा व इतर सर्व कर प्रवासा दरम्यान टोल व पार्किंग इत्यादी सर्व खर्च पुरवठादारांनी करावयाचा आहे.
10. वाहनाची सर्व कागदपत्रे अद्यावत नोंदणी प्रमाणपत्र,विमा वाहनाची नोंदणी, टुरीस्ट परमिट सर्व प्रकाराचे कर तसेच वाहन रस्ता सुरक्षा विमा PUC इत्यादी बाबत शासन वेळोवेळी कायदे व नियम अंमलात आणेल. त्याप्रमाणे सर्व कागदपत्रे अद्यावत असणे आवश्यक आहे. तसेच आवश्यक परवाने अद्यावत करण्याची जबाबदारी पुरवठादार यांची राहिल. त्यांचे कोणतेही दायीत्व जिल्हाधिकारी, वाशिम यांची राहणार नाही. करार कालावधीमध्ये वाहनाचा अपघात झाल्यास, जिवीत अथवा वित्त हानी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी व कायदेशिर दायीत्व फक्त पुरवठदार / वाहन मालकाची राहिल

Scanned with CamScanner

11.वाहन दुरुस्तीस घेऊन जातानां 3 दिवस अगोदर कार्यालयाची लेखी पुर्व परवानगी घेणे आवश्यक राहिल तसेच अर्जात वाहन दुरुस्तीसाठी कुठे घेऊन जाणार आहेत त्याबाबत उल्लेख असणे आवश्यक राहिल. वाहनामध्ये शिल्लक असलेले इंधन हे वाहन परत ताब्यात देतांना तेवढेच असले पाहिजे किरकोळ स्वरुपाची दुरुस्ती 1 दिवसाचे आत व मोठ्या स्वरुपाची दुरस्ती जास्तीत जास्त 3 दिवसात करण्याची जबाबदारी ही पुरवठादर व वाहन मालकाची राहिल.तसेच सदर कालावधीत पर्यायी वाहन सेवा पुरविण्याची जबाबदारी ही पुरवठादार / वाहन मालकाची राहिल. पर्यायी वाहनाची व्यवस्था न करुन दिल्यास वाहन सेवा गैरहजर बाबत मासिक भाड्याचे दर लक्षात घेता प्रतिदिन प्रमाणे आवश्यक ती रक्कम देयकातुन कपात करण्यात येईल किंवा पुरवठादारांने त्याचेकडील वाहन ना दुरुस्त अथवा इतर कारणांमुळे उपलब्ध न करुन दिल्यास त्या कालावधीत कार्यालयाने इतर वाहन भाड्याने लावल्यास त्यासाठी झालेला खर्च पुरवठादाराला द्यावयाचे रक्कमेतुन वसुल करण्यात येईल.

12.वाहनावर कोणत्याही प्रकाराचा गुन्हा, न्यायालयीन प्रकरणे नसावीत.

13. वाहन 24 तास संबधीत अधिकारी यांचेकडे उपलब्ध असावे. तसेच वाहन भाड्याने चालविण्याचा करार असेपर्यंत पुरवठादार / वाहन मालक कोणत्याही परिस्थितीत वाहनाचा खाजगी कामासाठी वापर करता येणार नाही. असे आढळुन आल्यास पुरवठादार / वाहन मालकाचे नांव काळ्या यादीत टाकण्यात येईल. उर्वरीत देयके अदा करण्यात येणार नाही.
पुरवठादार / वाहन मालक देयक अदा करतांना त्यातुन नियमाप्रमाणे आवश्यक करणे वजावट करण्यात येईल. (उदा. आयटी,सरचार्ज,एज्युकेशन, सेस इ.)

14.वाहन भाड्याने लावण्यासंदर्भात अटी व शर्ती यामध्ये बदल करण्याचा अधिकार उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र. 2 जिल्हाधिकारी, कार्यालय वाशिम यांनी राखुन ठेवला आहे.

15.पुरवठादार / वाहन मालक विहीत नमुन्यात रुपये 100 च्या स्टॅम्पपेपरवर अटी व शर्तीप्रमाणे करारनामा करुन द्यावा लागेल.

16. वरील सर्व मुद्दे संबंधीत वाहन धारकांनी / वाहन मालकांनी संपुर्ण मुद्देसुद्द माहिती भरुन द्यावी.

17.निविदा रक्कम व बयाणा रक्कम भरल्याशिवाय निविदा स्विकारल्या जाणार नाही.

18.ऑफलाईन भरण्यासाठी तांत्रीक अडचणी आल्यास NIC, जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम येथे संपर्क साधावा.

19.ऑफलाईन मध्ये दरपत्रक सादर करावे.

20. दरपत्रक धारकास अनामत रक्कम म्हणुन 5000/-रु. रक्कम व दरपत्रक1000/- रु.नायब नाझर याचें कडेशासन जमा करणे आवश्यक राहिल

21. दर महिना 48000 हजार रुपये चालकाच्या मजुरीसह पेक्षा जास्त भाडे या कार्यालयाकडुन अदा करण्यात येणार नाही.

सही/-
(संदिप महाजन)
प्रभारी उपजिल्हाधिकारी(भूसंपादन)क्र.२
जिल्हाधिकारी कार्यालय,वाशिम

प्रतिलीपी:-१. नायब नाझर जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम यांनी सदर जाहीर सुचना नोटीस बोर्डावर प्रसिध्द करावी व तसा अहवाल उलट टपाली सादर करावे.

२.मा.जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी (NIC,) जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम यांनी सदर जाहीर सुचना जिल्हा संकेतस्थळावर प्रसिध्द करावे .

३ .मा जिल्हा माहिती अधिकारी वाशिम याना माहिती ~~करीता सादर~~ व आवश्यक कार्यवाहि करीता

(संदिप महाजन)
प्रभारी उपजिल्हाधिकारी(भूसंपादन)क्र.२
जिल्हाधिकारी कार्यालय,वाशिम

Scanned with CamScanner